**राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर**
**बी.ए. (सी.ई.पी.)**

दिनांक : 21 / 07 / 2017

**बैठकीचे मिनिटस्**

ॲकॅडमिक कॉन्सिलच्या नियमानुसार बी.ए. (सी.ई.पी.) च्या अभ्यासक्रम सल्लागार मंडळा ची स्थापना करुन दिनांक 20-07-2017 रोजी बी.ए. (सी.ई.पी.) कार्यालयामध्ये दू. 01.00 वाजता बैठक बोलाविण्यात आली. या बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते. ही बैठक डॉ.महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत झालेल्या चर्चेचा व ठरावांचे मिनिटस् खालीलप्रमाणे आहेत.

**बैठकीस हजर असलेले सदस्य :**

1) डॉ. महादेव गव्हाणे - उप-प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (अध्यक्ष)
2) डॉ. ओमप्रकाश शहापूरकर - सी.ओ.ई., राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)
3) प्रा. आर.एन.कंद्रे - विभाग प्रमुख, भौतिकशास्त्र, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)
4) डॉ. अनुजा जाधव - इंग्रजी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)
5) डॉ. संभाजी पाटील - मराठी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)
6) प्रा. श्रीनिवास मोरे - इंग्रजी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)
7) प्रा. सुधीर जाधव - अर्थशास्त्र विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)
8) डॉ. अर्चना टाक - इतिहास विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)
9) प्रा. माधव शेळके - एम.पी.एस.सी. विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य)

बैठकीच्या सुरुवातीस डॉ.महादेव गव्हाणे यांनी सर्वांचे स्वागत केले व त्यानंतर प्रा.माधव शेळके यांनी बैठकीचे प्रास्ताविक करुन बैठकीस सुरुवात केली. त्यानंतर आजच्या बैठकीतील विषयानुसार उपस्थित सदस्य आपआपली मते मांडू लागली. तसेच काही सूचना व अनुमोदन आणि त्याचे ठरावात रुपांतर या पध्दतीने खालील बाबी ठरल्या.

01) बी.ए. (सी.ई.पी.) विभागाच्या मागील सत्रात झालेल्या परीक्षा, राबविलेले उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती याचा आढावा विभागाचे मुख्य समन्वयक प्रा.माधव शेळके यांनी सादर केला.

02) बी.ए. (सी.ई.पी.) विभागाच्या इंग्रजी, मराठी, राज्यंशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल या विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये संबंधित विषय शिक्षक, विभाग प्रमुख व सल्लागार मंडळ यांच्यामध्ये चर्चा होऊन अभ्यासक्रम तयार करावा. सदरील अभ्यासक्रम हा संबंधित विषयाच्या अभ्यास मंडळाकडून (BoS) मंजूर करुन घ्यावा.

03) बी.ए. (सी.ई.पी.) विभागाच्या इंग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल या विषयाचा अभ्यासक्रम Sem. V पर्यंत Complet होईल असा असावा. Sem. VI मध्ये अभ्यासक्रम हा Summary Type असावा. जेणेकरुन विद्यार्थ्यांना अभ्यासास वेळ मिळेल.

04) स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीकोनातून भूगोल विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन बी.ए. (सी.ई.पी.) विभागासाठी ऐच्छिक विषय इतिहास ऐवजी भूगोल असावा असे मत मांडले यावर चर्चा होऊन शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून ऐच्छिक विषय इतिहास ऐवजी भूगोल ठेवावा.

05) भूगोल विषयाचे प्रात्यक्षिक तासिका ही एकत्रितरित्या घ्यावी. प्रात्यक्षिक अभ्यासक्रम हा सोपा असावा.

06) विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीकोनातून इतर विषय शिकवले जावेत या उद्देशाने बुध्दिमापन चाचणी, विज्ञान, गणित हे विषय CBCS साठी ठेवावे.

11) डॉ.महादेव गव्हाणे यांनी या विद्यार्थ्यांसाठी आपल्या महाविद्यालयातर्फे नियोजित केलेल्या अभ्यासक्रमावर आपल्याच शिक्षकांनी पुस्तके तयार करावीत जेणेकरुन विद्यार्थ्यांचा अधिक फायदा होईल अशी सुचना केली त्यास डॉ.संभाजी पाटील यांनी अनुमोदन दिले व ठराव संमत करण्यात आला.

12) प्रा.आर.एन.केंद्रे यांनी शहरात व शहरा जवळील शाळा, कनिष्ठ महाविद्यालय इत्यादी ठिकाणचे गणित व विज्ञान विषयाचे शिक्षक बोलावुन त्यांचे मार्गर्शन या विद्यार्थ्यांना द्यावे यासंदर्भात सुचना केली त्यास प्रा.माधव शेळके यांनी अनुमोदन दिले तसेच आपल्या महाविद्यालयातील या कोर्सच्या संबंधित असलेल्या विषयामध्ये रस घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे यासाठी सर्वांना खुले आवाहन करावे असे सर्वानुमते ठरले.

13) प्रा.माधव शेळके यांनी अशी सुचना केली की, स्पर्धा परिक्षेमध्ये यशस्वी असलेल्या किंवा अशा प्रकारच्या यशा संबंधी अधिक माहितीपर मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एक बहिस्थ मार्गदर्शक / कार्यशाळा / मुलाखत इत्यादी ठेवण्यात यावे अशी सुचना केली त्यास प्रा.श्रीनिवास मोरे यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते ठराव संमत केला.

14) डॉ.अनुजा जाधव यांनी या विद्यार्थ्यांसाठी विशेष / वेगळा गणवेश असावा अशी सुचना केली त्यास डॉ.महादेव गव्हाणे आणि प्रा.आर.एन.केंद्रे यांनी उत्स्फुर्त अनुमोदन दिले व सर्वानुमते ठराव संमत झाला.

अशा सर्व ठरावानंतर अध्यक्षांच्या वतीने बैठकीचा समारोप करण्यात आला.

दिनांक : 12/05/2016
ठिकाण : कॉन्फरन्स हॉल, रा.शा.म.लातूर

**स्वाक्षरीत/-**
**डॉ. महादेव गव्हाणे**
अध्यक्ष (बी.ओ.एस. एम.पी.एस.सी.)
उप प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

'07) विभागाचे नाव सर्वसमावेशक असावे या हेतूने नावात बदल करण्याबाबत चर्चा झाली त्यामध्ये बी.ए. स्पेशल बॅच (एम.पी.एस.सी.) हे नाव बदलून बी.ए. (Competitive Examinations Programme - CEP) असे करावे.

07) बी.ए. (Competitive Examinations Programme - CEP) प्रथम वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना Entrance Test व मुलाखत घ्यावी.

अशा सर्व ठरावानंतर अध्यक्षांच्या वतीने बैठकीचा समारोप करण्यात आला.

दिनांक : 21/07/2017

ठिकाण : बी.ए. (सी.ई.पी.) कार्यालय.

स्वाक्षरीत/-

**डॉ. महादेव गव्हाणे**

संचालक / उपप्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

बी.ए. च्या विद्यार्थ्यांसोबत जोडण्यात येईल व सत्र सहा मध्ये असलेल्या प्रकल्प अभ्यास पूर्ण करण्यासाठी अभ्यासक्रमाशी निगडीत विषय संबंधित शिक्षकांकडून मंजूर करुन तो प्रकल्प विद्यार्थ्यांना दिला जाईल.

6) प्रा.आर.एन. केंद्रे यांनी संगणक साक्षरता व काळाची गरज म्हणून या विद्यार्थ्यांना एम.एस.सी.आय.टी. कोर्स बंधनकारक करावा असे सुचविले त्यास डॉ.अर्चना टाक व प्रा.सुधिर जाधव यांनी अनुमोदन दिले. व असे ठरले की, बी.ए. प्रथम वर्ष पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांनी स्वतंत्रपणे या परिक्षेस बसुन, उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाकडे या कोर्सची पूर्तता केल्याबद्दलचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. जे विद्यार्थी एम.एस.सी.आय.टी. ही प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांचे निकाल सी.ओ.ई. मार्फत राखिव ठेवण्यात येतील.

7) नवीन पध्दतीने बी.ए. कोर्स चालवत असल्याबद्दल ऍकॅडमिक कॉन्सिलमध्ये मा. कपले सर यांनी मराठवाड्यात अशा प्रकारचा प्रयोग पहिल्यांदाच होत असल्याबद्दल कौतुक केले व या नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील याबद्दलची माहिती डॉ.महादेव गव्हाणे यांनी उपस्थित सदस्यांना दिली. त्यानुसार डॉ.अनुजा जाधव, प्रा.श्रीनिवास मोरे व प्रा.सुधिर जाधव, यांनी काही सुचना केल्या व त्यास प्रा.माधव शेळके व डॉ.अर्चना टाक यांनी अनुमोदन दिले. यात असे ठरले की, आपल्या महाविद्यालयाच्या प्रांगणात तसेच नवीन सायन्स बिल्डिंग व आवश्यक वाटेल अशा महत्त्वाच्या ठिकाणी मोठे बॅनर लावुन या कोर्सची माहिती देणारी जाहिरात करावी. तसेच काही स्पर्धा परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे फ्रि सेमिनार्स ठेवावेत व ते सर्वांना खुले असावेत. या संदर्भात वृत्तपत्रामध्ये जाहिरात, हॅन्डआऊटस् तसेच महाविद्यालयाच्या माहिती पत्रकात प्रामुख्याने उल्लेख करुन माहिती द्यावी. प्रवेशाच्यावेळी एक काऊंसलिंग टेबल असावा व त्याबरोबरच प्रत्येक शाखेत प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या बॅचची माहिती प्रवेशासाठी बसलेल्या सर्व सदस्यांनी प्रामुख्याने द्यावी असे ठरले.

8) डॉ.अनुजा जाधव यांनी या बॅचच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी काटेकोर नियोजन असावे असे सुचविले व त्यास डॉ.महादेव गव्हाणे यांनी अनुमोदन दिले. यात विद्यार्थ्यांना वर्षभर होणाऱ्या सर्व परिक्षा, अभ्यासक्रम, सुट्ट्या, कार्यक्रम, गृहपाठ, प्रकल्प, अभ्यासेत्तर घटकांची माहिती देणारी पुस्तिका वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना देण्यात यावी असे ठरले.

9) उपस्थित सर्व सदस्य बी.ओ.एस. सोबतच थिंक टॅंक म्हणून काम करतील अशी सुचना डॉ.महादेव गव्हाणे यांनी केली व त्यास सर्वानुमते मान्यता मिळाली. व हे थिंक टॅंक प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला स्पर्धा परिक्षा क्षेत्रातील नामांकित संस्थांना भेट देतील व त्यानुसार आपल्या विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करतील.

10) डॉ.अनुजा जाधव यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकपेढी उपलब्ध करुन द्यावी अशी सुचना केली त्यास प्रा.श्रीनिवास मोरे यांनी अनुमोदन दिले. यात असे ठरले की, कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्या पध्दतीने पुस्तकपेढीची सुविधा आपल्या महाविद्यालयाकडून देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर या बॅचच्या विद्यार्थ्यांना ही सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

## राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

**बी.ओ.एस. - बी.ए.**

**दिनांक : 12/05/2016**

## <u>बैठकिचे मिनिटस्</u>

ऍकॅडमिक कॉन्सिलच्या नियमानुसार नवीन बी.ए. (एम.पी.एस.सी. स्पेशल बॅच) च्या बी.ओ.एस. ची स्थापना करुन दिनांक 12-05-2016 रोजी कॉन्फरन्स हॉलमध्ये सकाळी 11.00 वाजता बैठक बोलाविण्यात आली. या बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते. तसेच ही बैठक डॉ.महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत झालेल्या चर्चेचा व ठरावांचे मिनिटस् खालीलप्रमाणे आहेत.

**1) बैठकीस हजर असलेले सदस्य :**

| | |
|---|---|
| 1) डॉ. महादेव गव्हाणे | - उप-प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (अध्यक्ष) |
| 2) डॉ. ओमप्रकाश शहापूरकर | - सी.ओ.ई., राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |
| 3) प्रा. आर.एन.कैंद्रे | - एच.ओ.डी. (भौतिकशास्त्र), राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |
| 4) डॉ. अनुजा जाधव | - इंग्रजी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |
| 5) डॉ. संभाजी पाटील | - मराठी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |
| 6) प्रा. श्रीनिवास मोरे | - इंग्रजी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |
| 7) प्रा. सुधिर जाधव | - अर्थशास्त्र विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |
| 8) डॉ. अर्चना टाक | - इतिहास विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |
| 9) प्रा. माधव शेळके | - एम.पी.एस.सी. विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (सदस्य) |

बैठकीच्या सुरुवातीस डॉ.महादेव गव्हाणे यांनी सर्वांचे स्वागत केले व त्यानंतर प्राध्यापक माधव शेळके यांनी बैठकीचे प्रास्ताविक करुन बैठकीस सुरुवात केली. यामध्ये याआधी झालेल्या ऍकॅडमिक कॉन्सिलच्या बैठकीतील निर्णयांचा संदर्भ घेऊन डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थित सदस्यांना एम.पी.एस.सी. स्पेशल बॅच (बी.ए.) या संदर्भात माहिती दिली व तिचे महत्त्व सांगुन नेमके या बी.ओ.एस. च्या बैठकीत सर्व सदस्यांची काय भुमिका असेल व त्यांनी अभ्यासक्रम ठरवत असताना कुठल्या रोखाने अभ्यासक्रम ठरवावा यासंदर्भात माहिती दिली. त्याच अनुषंगाने प्रा.माधव शेळके यांनी उपस्थितांना सद्यस्थितीत शाहू प्रबोधिनीतर्फे चालू असलेल्या एम.पी.एस.सी. च्या तयारी वर्गाची माहिती दिली व सध्या इतर ठिकाणी व बाजारात नेमक्या कोणत्या बाबी प्रचलित आहेत व आयोगाला विद्यार्थ्यांकडून नेमके काय अपेक्षित आहे याची पार्श्वभुमी सांगितली व त्यानुसार सदस्य आपआपली मते मांडू लागली. तसेच काही सुचना व अनुमोदन आणि त्याचे ठरावात रुपांतर या पध्दतीने खालील बाबी ठरल्या.

1) प्रा.आर.एन. कैंद्रे यांनी या बॅचसाठी विद्यार्थी संख्या मर्यादीत असावी अशी सुचना केली व त्यास डॉ. अनुजा जाधव यांनी अनुमोदन दिले व या वर्गासाठी सर्वानुमते 60 विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आली.

2) डॉ. महादेव गव्हाणे यांनी प्रवेश प्रक्रियेसाठी सुचना केली व त्यास डॉ.संभाजी पाटील यांनी अनुमोदन दिले व इयत्ता 12 वी (कला, वाणिज्य, विज्ञान) मध्ये 65 टक्के असलेल्या विद्यार्थ्यांना थेट प्रवेश द्यावा असे ठरले तसेच गरज भासल्यास प्रवेश परिक्षा घ्यावी. किमान 50 टक्के गुण असल्याशिवाय या बॅचला प्रवेश मिळणार नाही. इच्छुक विद्यार्थ्यांना या बॅचसंबंधी संपूर्ण माहिती देण्यात यावी जसे की, शिकण्यासाठी असलेले विषय, नियम व अभ्यासक्रमाची फिस. हि फिस प्रत्येक सेमिस्टरला रुपये 6,000/- + कॉलेज प्रवेश फिस एवढी असावी असे ठरले.

3) डॉ.अनुजा जाधव यांनी या कोर्ससाठी विषय ठरविण्यासाठी सुचना केली व त्यास प्रा.आर.एन.कैंद्रे यांनी अनुमोदन दिले व आपल्याच महाविद्यालयातील रेग्युलर बी.ए. प्रमाणे तीन ऐच्छिक विषय त्यात राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास या कोर्ससाठी मात्र बंधनकारक असतील. तसेच इंग्रजी (अनिवार्य) व मराठी (अनिवार्य) द्वितीय भाषा असतील परंतू हे विषय रेग्युलर बी.ए. पेक्षा वेगळे असतील. यासोबतच विद्यार्थ्यांनी भूगोल, मानवी हक्क व मानव संसाधन विकास, अंकगणित, बुध्दिमत्ता चाचणी, विज्ञान, चालु घडामोडी इत्यादी विषय देखिल अभ्यासले पाहिजेत असे ठरले. परंतू डिग्री मात्र रेग्युलर बी.ए. प्रमाणे वर नमुद केलेल्या तीन विषयातच मिळेल याची कल्पना देखील विद्यार्थ्यांना द्यावी असे ठरले. यात जे जादा विषय शिकलेले आहेत त्यांचे मात्र वेगळे प्रमाणपत्र (ज्या विषयांसाठी शक्य आहे) ते देण्याचे ठरले.

4) डॉ.ओमप्रकाश शहापूरकर यांनी या कोर्ससाठीच्या परिक्षा पध्दती व श्रेयांकणाबद्दल प्रश्न उपस्थित केला व काही सुचना केल्या त्यास डॉ.महादेव गव्हाणे यांनी अनुमोदन दिले. व पुढीलप्रमाणे परिक्षा पध्दती ठरली. यात सर्व विषयांची परिक्षा ही रेग्युलर बी.ए. प्रमाणेच सी.ओ.ई. अंतर्गत असेल. तसेच त्याचे रेकॉर्डसुध्दा त्यांच्याकडूनच सांभाळले जाईल असे ठरले. यात एक 30 गुणांची अंतर्गत परिक्षा (लेखी-पारंपारिक) तसेच दुसरी 30 गुणांची अंतर्गत परिक्षा (लेखी-पारंपारिक) व शेवटी 30 गुणांची एक सत्रांत परिक्षा (बहुपर्यायी) घेण्याचे ठरले. यात 10 गुण हजेरीसाठी रेग्युलर बी.ए. प्रमाणे राखीव ठेवण्यात आले आहेत. यासोबतच प्रा.माधव शेळके यांनी दर रविवारी झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित एक बहुपर्यायी परिक्षा घ्यावी अशी सुचना केली ही परीक्षा सर्व विषयांची मिळुन 100 गुणांची असावी व त्यासाठी लागणाऱ्या परिक्षा पध्दतीचे सर्व साहित्य, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, निकाल व इतर रेकॉर्ड शाहू प्रबोधिनी कडून पुरविले व सांभाळले जाईल ते सी.ओ.ई. कडे असणार नाही. परंतू ज्या विषयांची प्रमाणपत्रे द्यावयाची आहेत त्याचे रेकॉर्ड मात्र सी.ओ.ई. यांच्या कार्यालयाकडे असणे आवश्यक आहे असे सर्वानुमते ठरले.

5) डॉ.अनुजा जाधव यांनी बी.ए. प्रथम वर्ष मुल्य शिक्षण, बी.ए. द्वितीय वर्ष ॲड ऑन कोर्स व बी.ए. तृतीय वर्ष प्रकल्प अभ्यास यासंदर्भात सुचना केल्या त्यास प्रा.श्रीनिवास मोरे यांनी अनुमोदन दिले व त्यामध्ये रेग्युलर बी.ए. प्रमाणेच या कोर्ससाठी सुध्दा बी.ए.प्रथम वर्षासाठी मुल्य शिक्षण बंधनकारक असावे असे ठरले. तसेच बी.ए.द्वितीय वर्षासाठी ॲड ऑन कोर्स सॉफ्ट स्किल्स प्रथम व द्वितीय सत्रात दोन्हीकडे बंधनकारक असेल मात्र ह्या सॉफ्ट स्किल्सचा अभ्यासक्रम शाहू प्रबोधिनीतर्फे ठरविण्यात येईल व त्याची अंमलबजावणीसुध्दा प्रबोधिनीतर्फेच होईल. रेग्युलर बी.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना सुध्दा या कोर्ससाठी प्रवेश घेता येईल परंतू हा कोर्स महाविद्यालयात इतर कोर्सेससाठी उपलब्ध असलेल्या सॉफ्ट स्किल्सपेक्षा पूर्णपणे वेगळा व स्वतंत्र असेल. त्याचप्रमाणे बी.ए. तृतीय वर्षामध्ये सत्र पाच मध्ये पर्यावरण हे रेग्युलर